**निशाणी क्र. २६२ खालील आदेश.**
**(पारीत दिनांक ३० /११/२०२४)**

प्रस्तुतचा अर्ज वादीने दाव्यामध्ये दुरुस्ती होवून मिळण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. वादीने असे कथन केले आहे की, दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र. २६अ आशाताई जयसिंग चव्हाण हया मयत झाल्या आहेत. त्यांचे वारस प्रतिवादी क्र. २६ब व २६ क हे दाव्यात सामील असल्याने त्यांना पुन्हा अभिलेखावर वारस म्हणून सामील करण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे, दाव्यातील शिर्षकामध्ये त्यांच्या नावापुढे "मयत" असे नमूद करणे आवश्यक आहे. सदरची दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची असून त्याचा दाव्यावर कोणताही परीणाम होणार नाही. सबब, प्रस्तुतचा अर्ज मंजूर व्हावा अशी विनंती त्यांनी याव्दारे केलेली आहे.

३. प्रतिवादींना संधी देवूनही त्यांनी त्यांचे म्हणणे अर्जावर दाखल केलेले नाही.

४. युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोन केले. दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र. २६अ हया मयत झालेल्या आहेत. प्रतिवादी क्र. २६अ यांना वारस प्रतिवादी क्र. २६ब व २६क हेच आहेत. त्यामुळे, प्रतिवादी क्र. २६अ चे वारस अभिलेखावर घेण्याची गरज नाही. वादीला फक्त प्रतिवादी क्र.

२६अ च्या नावापुढे मयत असे नमूद करावयाचे आहे. त्यासाठी हा अर्ज दिलेला आहे. सदर दुरुस्तीमुळे प्रकरणावर कोणताही परीणाम होणार नाही. उलट, न्यायदानास मदतच होणार आहे. प्रस्तुतची दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची असून सदरची दुरुस्ती ही आवश्यक आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीला निर्देशीत करण्यात येते की, आदेशापासून चौदा दिवसाच्या आत त्याने दुरुस्ती करावी व दुरुस्ती प्रत न्यायालयात दाखल करावी.

MANGESH JAISWAL
Digitally signed by MANGESH JAISWAL
Date: 2024.11.30 15:08:44 +0530

इस्लामपूर (एम. एन. जयस्वाल)

दिनांक ३० /११/२०२४ दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर

इस्लामपूर, जि. सांगली.

**-:<u>CERTIFICATE</u>:-**

I affirm that the contents of this P.D.F. file, order are same word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Sunil M. Patil, Stenographer Grade-3 |
| Court Name | :- | Shri. M. N. Jaiswal,<br>2nd Jt. Civil Judge, Jr. Dn., Islampur. |
| Date of decision | :- | 30/11/2024 |
| Date of typing | :- | 30/11/2024 |
| Order signed by PO. on | :- | 30/11/2024 |
| Order uploaded on | :- | 30/11/2024 |